# Sale of old Vehicle

उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर येथील ०१ निर्लेखित करण्यात येणारे वाहन जशी आहे, तशा अवस्थेत लिलावाद्वारे विक्री करण्यासाठी जाहिरात देण्यात येत आहे. सदर वाहनाची माहिती खालील प्रमाणे आहे.

निर्लेखित करण्यात येणाऱ्या वाहनाचा तपशिल :

| अ.क्र. | वाहन क्रमांक | वाहनाचा प्रकार | वाहन खरेदी दिनांक | लिलावाचा दिनांक व वेळ | वाहन पाहण्याचे व लिलावाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | MH-१३-BN-१६७९ | Bolero SLE २ WD ७ str. | १९/०४/२०१४ (११ Yrs) | २१/०४/२०२५ | उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ब/४ बाळी बिल्डिंग सिव्हील लाईन्स, शासकिय दूध डेअरी समोर सात रस्ता, सोलापूर ४१३००३ |

## अटी व शर्ती

१) बोलीदाराने अनामत रक्कम रु.५,०००/- रोखीने उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर येथे लिलावाच्या वेळी जमा करावी.

२) दि. १२/०४/२०२५ ते १८/०४/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत वर नमूद केलेल्या ठिकाणी वाहन पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

३) दि. २१/०४/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत बोलीदाराने उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर येथे लिलाव करण्याकरीता हजर रहावे.

४) उच्यतम बोलीदाराने लिलावाची रक्कम धनाकर्षाद्वारे (DD) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नावे जमा करावी.

५) सदर धनाकर्ष जमा झाल्यानंतर बोलीदारास वाहनाचा ताबा व गेटपास देण्यात येईल.

६) सदर वाहन विक्री करण्याचे अंतिम अधिकार सक्षम प्राधिकारी यांना आहेत. (प्रक्रिया थांबवणे व पुढे ढकलणे किंवा रद्द करणे इत्यादी)

७) बोलीदारास आधारकार्ड व वास्तव्याचा पुरावा सादर करावा लागेल.

८) वाहनाच्या बाबत न्यायिक क्षेत्र सोलापूर राहील.

९) सदर वाहन उच्चतम बोलीदाराने विकत घेतल्यावर या वाहनावरील “महाराष्ट्र शासन” हे लिहिलेले खोडावे. तसेच वाहनाचा भविष्यात गैरउपयोग/अपघात वगैरे झाल्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जबाबदार राहणार नाही, त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी वाहन खरेदीदाराकडे राहील.

१०) यशस्वी झालेल्या उच्चतम बोलीदाराने मंडळातील वाहन खरेदी केल्यानंतर वाहनाची तोडफोड करुन विल्हेवाट लावावयाची असल्यास स्वतः प्रादेशिक परिवहन कार्यालयाशी संपर्क साधून कार्यवाही करावी. मंडळातील जुने वाहन एकदा खरेदी केल्यानंतर मंडळ कोणत्याही कार्यवाहीसाठी जबाबदार राहणार नाही.

११) बोलीदाराने वाहन घेताना रु.१००/- च्या स्टँप पेपरवर हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहील.